पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ११
सभावृत्तांत

दिनांक - ०६/०१/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०६/०१/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर – सभापती**
२. मा.सुपे आशा रविंद्र
३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
७. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर-.प्र.क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.श्री.गायकवाड जीवन -(कार्यकारी अभियंता- स्थापत्य), मा.प्रविण घोडे - (कार्यकारी अभियंता-विद्युत), मा.श्री.व्ही.सी.काळे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.संजय घुबे - उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.कोंडे के.बी.उपअभियंता, (पाणीपुरवठा), मा.मनोज सेठीया–उपअभियंता, (जलनि:सारण),मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य) मा.श्री.एस.एस. कु-हाडे–क.अभियंता (विद्युत), मा.श्री.पवार व्ही.एस. क.अभियंता (विद्युत) मा.श्री.इप्पकायलएस.एच.लेखाधिकारी, मा.श्री.तानाजी दाते- सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.बी.के.तापकीर- सहा.उद्यान सहाय्यक, मा.संभाजी ऐवले – समाजविकास अधिकारी – नागरवस्ती विकास योजना, मा.श्री.हनवते पी.एस.- समाजसेवक, मा.राजेश जगताप- कार्यालयीन अधिक्षक, श्री.नाडेकर बी.के. (स.शि), श्री.शिवाजी विद्यालय, भोसरी, मा.श्री.फुगे एन.जे.- सहा.क्रिडा पर्यवेक्षक

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्रमांक १.** तरतूद वर्गीकरणाबाबत.पत्र.स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. इस्था/१/कावि/१३/२०१६, दि.५/१/२०१६.

**विषय क्रमांक २.** भोसरी स.नं.१येथील नियोजित आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्रास पै.मारुतराव रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र असे नांव देणेबाबत. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

**विषय क्रमांक ३.**वॉर्ड क्र.३५ मधील पी.एम.टी.चौकाजवळील श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे सुशोभिकरण करणेबाबत. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

----

अ) दिनांक ०२/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा(कार्यक्रमपत्रिका १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- **२२** विषय क्रमांक- १

दिनांक- ६/१/२०१६

सूचक- मा.अनुराधा गोफणे अनुमोदक- मा.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांचेकडील दिनांक १५/१०/२०१५ चे पत्र.

इंद्रायणीनगर मधील चौकास नाव देणेबाबत. मा.आमदार महेशदादा किसन लांडगे यांचे दिनांक ९/१०/२०१५ चे पत्र मा.आमदार महेशदादा किसन लांडगे यांनी त्यांचे बंधू श्री.राजेंद्र लांडगे, रा.भोसरी या ठिकाणी वास्तव्यास असून त्यांनी त्यांचे वडील कै. विष्णू सोपान लांडगे उर्फ मालक यांचे नांव इंद्रायणीनगर मधील तिलक रेसिडेन्सी चौकास नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- **२३** विषय क्रमांक- २

दिनांक- - ६/१/२०१६

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा.अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटन, गणेश जाधव, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड शहर जिल्हा यांचे दिनांक ४/१२/२०१५ चे पत्र.

भोसरी येथे नव्याने चालू करण्यात आलेली (बीआरटी) भोसरी बस टर्मिनलला **शहीद संतोष महाडीक** असे नाव देण्याबाबत. विषय क्र. २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

## सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले

ठराव क्रमांक- २४ विषय क्रमांक- १

दिनांक- - ६/१/२०१६

सूचक- मा.अनुराधा गोफणे अनुमोदक - मा.आशा सुपे

संदर्भ- स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. इस्था/१/कावि/१३/२०१६,

दिनांक ५/१/२०१६ चे कडील पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ करीता तरतूद र.रु.१००००/- करणेत आली होती. दि. ४/१२/२०१५ अखेर र.रु. ३६१०/- इतका खर्च झालेला आहे व उर्वरीत शिल्लक र.रु.६३९०/- इतकी असून सद्यस्थिती पाहता ती कमी आहे. इ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाकडील सन २०१५-१६ चे बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर तरतूद र.रु.१५,००,०००/- इतकी आहे त्यामधुन दि. २३/१२/२०१५ अखेर र.रु.११,१९,८७१/- असा खर्च झालेला आहे व उर्वरीत शिल्लक र.रु.३,८०,१२९/- इतकी आहे. त्या रकमेमधून र.रु.५०,०००/- इतकी रक्कम स्थापत्य अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक आहे. इ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर २०१५ - १६ करीता तरतूद र.रु.१०,०००/- इतकी आहे. दि. ४/१२/२०१५ पर्यंत सदर लेखा शिर्षावर र.रु.३६१०/- खर्च झालेला आहे व उर्वरीत र.रु.६३९०/- इतकी शिल्लक आहे. सद्यस्थितीत पुढील कालावधीसाठी सदरची रक्कम कमी असलेने इ स्थापत्य विभागाकडील बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावरील तरतूद र.रु.१५,००,०००/- मधून ५०,०००/- इतकी वर्ग करणे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-२५ विषय

क्रमांक- २

दिनांक- - ६/१/२०१६

सूचक- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक-मा.सुरेखा गव्हाणे

संदर्भ- मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

भोसरी येथील प्रभाग क्र.३५ (भोसरी गावठाण) स.नं.१ येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती प्रशिक्षण केंद्र बांधणेबाबत कार्यवाही चालू आहे. सदर कुस्ती प्रशिक्षण केंद्रास **" पै.मारुतराव रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र "** असे नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक-२६ विषय क्रमांक- ३

दिनांक- - ६/१/२०१६

सूचक- मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे अनुमोदक-मा. चंद्रकांत वाळके

संदर्भ- मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

वॉर्ड क्र.३५ मधील पी.एम.टी.चौकाजवळील श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे सुशोभिकरण करणेत येणार असून चौथ-याची उंचीही वाढविणेत येणार आहे. त्यासाठी पुतळयाचा चौथरा, मेघडंबरी व संरक्षक जाळी तोडणे आवश्यक आहे. सदरची कामे सुशोभिकरणासाठी आवश्यक असल्याने पुतळयाचा चौथरा मेघडंबरी, संरक्षक जाळी इ.तोडण्यास व पुतळयाची उंची वाढवून सुशोभिकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/३०/२०१६
दिनांक- २७/०१/२०१६ **सही / -**

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी - ३९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.६/१/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.चंद्रकांत वाळके –** शिलाई मशिन बाबत पेपरला वाचले होते. गेल्या २०१३ पासून कोणत्याही प्रकारचे मशिन वाटप केले नाही. कोणत्या प्रभागामध्ये किती मिळाले आहे हे माहिती झाले पाहिजे. त्याची यादी मिळाली तर बरे होईल.

**मा.ऐवले** - शिलाई मशिन ८,५००वेब साईटवर प्रसिध्द केली आहे. हे भांडार विभागाशी संबंधीत आहे. भंडार विभागाने खरेदी करुन नागरविकास विभागाच्या ताब्यात दिल्या तरच नागर विकास विभाग शिलाई मशिनचे वाटप करील. मा.आयुक्त साहेब स्वत: सन्मा.नगरसेवकांना विश्वासात घेऊन अहवाल प्रसिध्द करणार आहे. शिवण यंत्र खरेदी करायची का नाही हे मा.आयुक्त साहेब ठरवणार आहे. मा.आयुक्त साहेबांनी मान्यता दिली तरच खरेदी करणार आहे. आमचे फक्त वाटपाचे काम आहे.

**मा.चंद्रकांत वाळके –** जर मा.आयुक्त साहेबांनी मान्यता दिली तर वाटप करण्यास किती कालावधी लागेल?

**मा. ऐवले -** कालावधी मी नेमका सांगू शकत नाही. ठेकेदाराला कालावधी दिला आहे त्यानुसार होईल.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती-** सायकल वाटप बाबत काय झाले?

**मा. ऐवले –** संबंधीत ठेकेदाराला ऑर्डर दिली आहे. वेब साईटवर प्रसिध्द केले आहे. येत्या आठ दिवसात प्रसिध्द होणार आहे.

**मा.श्रध्दा लांडे –** पवनाथडी बाबत काय परिस्थिती आहे.

**मा. ऐवले –** पवनाथडी १२/२/२०१६ ते १४/२/२०१६ या दरम्यान असणार आहे. दि.४/१/२०१६ पासून नोंदणी चालू आहे. जे बचतगट सध्या चालू असून, दिड वर्षे पुर्ण झालेले आहे का हे बघून आधार कार्डबाबतची झेरॉक्स बघूनच नोंदणी करणार आहे. जे फॉर्म देण्यात येतात त्यामध्ये सविस्तर माहिती आहे. नियमाप्रमाणे महिलांचे पासबुक व संपूर्ण रेकॉर्ड तसेच जे बचतगट सध्या चालू आहेत अशा बचत गटांना मिळणार आहे.

बचतगटांना अनुदान देण्यासाठी मा.आयुक्त साहेबांकडे फाईल आहे. मा.स्थायी समितीमध्ये चार वेळा मुदत दिली आहे. मुदतवाढ दिल्यामुळे उशिर झाला आहे. सर्व तयार आहे. ३१ मार्च २०१६ पर्यंत देण्याचा प्रयत्न करणार आहे. अपात्र झालेले जे असतील त्यांनी महिन्याच्या पहिल्या सोमवारी विभागामध्ये चौकशी करण्यात यावी. नगरविकास विभागाने मा.आयुक्त साहेबांच्या सहीने इ प्रभाग कार्यालयामध्ये पत्र दिले आहे. प्रभागामध्ये बैठक व्यवस्था करावी. तीन खुर्च्या, दोन टेबल, एक कपाट असावे. इ प्रभागाचे नागरवस्ती विभागाचे काम इथेच होईल. दोन कर्मचारी येथेच बसून येथील काम करणार आहेत. कर्मचारी तेथे आले की, समाज विकास विभाग/नागरवस्ती विकास विभाग असे नाव देण्यात यावे. लगेच त्यांची बसण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सायकल, शिवण यंत्र तसेच इतर २४ सुविधांचा लाभ ३१ मार्च पर्यंत दिला जाईल.

**मा.चंद्रकांत वाळके** - आमचे येथील पाणी पुरवठा विस्कळीत आहे. आम्ही विचारणा केली असता पाणी कपात आहे असे सांगण्यात आले. त्यामुळे पाण्याला प्रेशर नाही. असे या विभागाचे उत्तर देण्यात आले. पाण्याबाबत सुधारणा करण्यात यावी. दर गुरुवारी एमआयडीसीची लाईट व्यवस्था जाणार आहे. त्याबद्दल महापालिकेने काय व्यवस्था केली आहे. संपूर्ण भोसरी परिसरात लाईट जाणार आहे.

**मा.अंकुश कोंडे –(उपअभियंता पाणीपुरवठा)** - लोडशेडींगचा तिसरा गुरुवार आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – अगोदर सूचना देण्यात यावी.

**मा.चंद्रकांत वाळके -** एमआयडीसी २४ तास लाईट देणार नाही. त्याचा शुक्रवार, शनिवार पाण्यावर परिणाम होणार आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** आमच्याकडे सगळया वस्त्यांमध्ये पाणी कमी येते. त्यासाठी काय उपाययोजना करणार आहे.

**मा.अंकुश कोंडे –(उपअभियंता पाणीपुरवठा) –** टँकरने पाणीपुरवठा करण्यात येईल. पाण्याची टाकी भरली पाहिजे असा प्रयत्न केला जाईल.

**मा.चंद्रकांत वाळके –** नागरीक ज्यावेळी आम्हाला तक्रार करतात त्यावेळी नागरीकांना आम्हाला तोंड दयावे लागते. नगरसेवक म्हणून आम्हाला त्यांचेशी बोलावे लागते.

**मा.आशा सुपे** – साई हॉसिंग सोसायटी समोर एक पाईप लाईन लिकेज झाले आहे. तेथील प्लंबर काहीही करत नाही. त्या प्लंबरची बदली करावी. लिकेज प्रॉब्लेम त्याचेकडून व्यवस्थित होत नसेल तर त्याचा काय उपयोग. पाणी १०.०० वा. येते. स.नं.९ संभाजीनगरमध्ये पाणी येत नाही. आता बजेटला तीन महिने राहिले आहे. सर्वच महत्वाच्या निविदावर सही केली आहे. सर्वत्र आऊट झाले आहे. ते लवकरात लवकर प्रसिध्द करावे.

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य) -** लवकरच ३१ मार्च पर्यंत करणार आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** आमचेकडील डांबरीकरणचे काय करणार आहे?

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य) –** एजन्सीबरोबर मिटींग झाल्यावर काम करण्यात येईल.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** अलंकापुरी येथील पाईप लाईन कधी चालू करण्यात येईल?

**मा.बगली उपअभियंता (पाणीपुरवठा)** – पद्मावतीनगर पासून बीआरटी चालू आहे. लेफ्ट साईडमधून पाईप लाईन चालू करुन देतो. टेक्निकल आहे त्याप्रमाणे आम्ही करणार आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** दुस-या वस्तीला जाणारा वॉल बंद करता. व पाणी चालू करता. पद्मावती पासून पाईप लाईन कधी चालू करणार? वॉलचा तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? पाण्याची तक्रार एकही आली नाही तर बरे होईल. टॉयलेट अनुदान दुस-या टप्प्यात असते ते कधी देणार आहे?

**मा.तानाजी दाते –(सहा आरोग्याधिकारी)** – पहिले १३६ टॉयलेट दिले आहे. १७४ बांधकाम पुर्ण झाले आहे. व ड्रेनेजला जोडले आहे. ते सर्व दुसरा हप्ता देणार आहे. प्राप्त होणारे अर्ज व अनुदान देणे यामध्ये तफावत होती. ४६० अर्ज अपलोड केले आहे. १७४ सीटी तसेच जशा सूचना देतील त्या पध्दतीने काम करावे लागते.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** धुराची फवारणी, कच-याची गाडी वेळेवर येत नाही.

**मा.सुरेखा गव्हाणे** – कच-याची गाडी दोन चौक कचरा घेतला की लगेच जाते, परत कच-याची गाडी येतच नाही. तसाच कचरा पडून राहतो.

**मा.तानाजी दाते -(सहा आरोग्याधिकारी)** – ठीक आहे मी कर्मचा-यांकडून काम करुन घेतो.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** धूर फवारणी टेंडर कोणाकडे आहे त्यांना बोलावून घ्या. कुठल्याच ठिकाणी धूर फवारणी होत नाही. औषध फवारणी सुध्दा होत नाही. आम्हाला एक कच-याची गाडी वाढवणे**.**

**मा.तानाजी दाते -(सहा आरोग्याधिकारी)** – धूर फवारणी करणा-या कर्मचा-याला त्या भागामध्ये सहा दिवसासाठी एक पाकिट दिलेले असते. त्या पध्दतीने ते धूर फवारणी करतात. कच-याची एक गाडी खराब आहे. खासदार, आमदार निधीतून वाहन मिळाले तर बरे होईल. मान्यता असेल तरच गाडी खरेदी करु शकतो.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** इ प्रभागासाठी एक कच-याची गाडीची मागणी करा.

**मा.चंद्रकांत वाळके**– चाफेकर चौकमधील फोटो व बातमी होती. तेथील अतिक्रमण सगळे क्लिअर झालेले होते. तसे आपलेकडे झाले पाहिजे.

**मा.आशा सुपे** - आळंदीरोड होईल का क्लिअर आपले पण पेपरमध्ये फोटो येईल.

**मा.अनुराधा गोफणे** - ब-याच कामांच्या वर्कऑर्डर झालेल्या आहेत. बाकीच्या कामाच्या वर्कऑर्डरचे काय झाले?

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य)** – १४८ निविदा आहेत**.** ११ निविदा अजून काढायच्या आहेत.१३६ निविदा अजून केलेल्या आहेत. पाच लोकांनी तरतूद कमी करण्यासाठी पत्र दिले आहे. १३१ ठेकेदार तयार आहे. मा.स्थायी समितीमध्ये २५ लाखाचे वर असलेली तीन कामे आहेत. १० कामे सीलसाठी आहे. १३१ कामाची वर्कऑर्डर दिलेली आहे. करारनामा पत्र दिलेले आहे. नवीन १३ कामांची प्रसिध्दी केली आहे. ५ कामांना सीलसाठी पाठविली आहे. सहा कामे आहेत एकही ठेकेदार प्राप्त झालेला नाही. संडास, ब्लॉकची किचकट कामे आहेत त्यामुळे ठेकेदार नाही. १५ दिवसाची मुदतवाढ असते. ८,१० दिवसात ते काम होईल. ११ नवीन कामे आहेत त्या कामांना वेळ लागेल.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमधील ब्रीजचे कामाचे काय झाले?

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य) -** उपअभियंता यांनी पाहणी केल्यानंतर त्यांचा अहवाल देतील. चिफ इंजिनिअर मिटींगला ठरवतील. फक्त परवानगी घ्यायची आहे. पिलर उभे करून ते काम करणार आहे.

**मा.चंद्रकांत वाळके -** भोसरी ते वाकी पर्यंत रस्ता होणार आहे असे पेपरला आले होते. आपलेकडील ६१ मीटर रस्ता होणार आहे का?

**मा. उपअभियंता** - प्राधिकरणचा भाग आहे तो. हे सगळे काम प्राधिकरण करणार आहे. ४५ मीटर रस्ता करणार आहे. साडे बावीस मीटर त्यांच्या ताब्यात नाही. महापालिका हद्दीत संपादन केले आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर- सभापती –** आमचेकडील स्विमींग पुलाचे काय झाले?

**मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य) –** बांधकाम परवानगी विभागाकडून परवानगी घ्यावी लागेल. त्याकरीता दहा, पंधरा दिवस लागतील. बांधकाम परवानगी विभागाकडील परवानगी शिवाय टेडर घेता येणार नाही.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.